# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक ३.३.२०२३ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक** ६६ - अमरावती महानगरपालिका अंतर्गत दैनंदिन साफसफाई करीता पाच झोनमध्ये प्रत्येकी एक कंत्राटदार नियुक्त करण्याच्या अनुषंगाने ई-निविदा करण्याबाबत.

**ठराव क्रमांक** ६६ - (अमरावती महानगरपालिका अंतर्गत दैनंदिन साफसफाई करीता २५/५/२०१८ रोजीच्या स्थायी समिती ठराव ३६ नुसार वाहन घंटीकटले, घरोघरी कचरा गोळा करणे, दैनंदिन साफसफाई बाबत सर्व बाबींचा समावेश अटी व शर्ती मध्ये अंतर्भूत करुन त्यानुसार निविदा प्रक्रिया केली. विषय क्र. ८७ - (३.११.२०१८) नुसार दैनंदिन साफसफाई प्रभागनिहाय कंत्राटदारासोबत करारनामा करुन कार्यारंभ आदेश डिसें 2018/जाने 2019 मध्ये कामे देण्यात आली.)

उपरोक्त विषयान्वये, सन २०१९ पासून चे ५ वर्षातील देण्यात आलेल्या कंत्राटाचे पूर्ण ३+१ मुदतवाढ मध्ये कामे झाल्यानंतर उर्वरित १ वर्षाची मुदतवाढ किंवा मधे महानगरपालिकेच्या साफसफाई चे धोरण कचरा व्यवस्थापन नियम २००० व २००१ मधील तरतुदीचे पालन करतांना कामकाजाच्या सोईचे दृष्टीकोनातुन सर्व प्रशासकीय कामे ५ कार्यरत प्रशासकीय झोन मार्फत होतात. या ठिकाणी सहाय्यक आयुक्त यांचे अधिकार व त्यांच्या देखरेखीत सक्षम प्रशासकीय यंत्रणा उपलब्ध व कार्यरत आहेत.

त्यानुसार झोन निहाय नियंत्रणाचे ५ झोन मध्ये ५ कंत्राटदार नियुक्त केल्यास दैनंदिन साफसफाई यंत्रणा प्रशासकीय रित्या योग्य होवून उत्तम साफसफाई होणेस्तव सहा. आयुक्त द्वारे नियंत्रण होईल, ५ कंत्राटदार कार्यरत असल्यास एखादा झोन मध्ये साफसफाई दुय्यम/अडचण निर्माण झाल्यास इतर झोनच्या कंत्राटदारामार्फत कामे घेवून (त्याच दरात) कामकाजात व्यत्यय/ समस्या निर्माण होणार नाही. तेव्हा दि. २१.१२.२०२२ रोजीच्या प्रशासकीय आदेशानुसार ५ झोन निहाय ५ कंत्राटदारांची नियुक्ती कंत्राट प्रक्रिया करणे प्रशासकिय हिताचे वाटते.

तेव्हा सदर विषयाचे म्हणजे प्रभाग निहाय कंत्राटदाराचे झोन निहाय कंत्राटनुसार करण्याचे ठरलेल्या विषयाचे धोरण बदलत असल्या कारणाने विषय अटी व शर्ती निविदा काढण्याच्या मंजुरी करीता सर्वसाधारण सभेत पाठविणे बाबत प्रस्ताव तयार करुन या सर्व समावेशक बाबींचा अटीशर्ती मध्ये अंतर्भूत करुन झोन निहाय कंत्राट देण्याचे धोरण सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करीता सादर करण्यात आले आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर धोरणास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगर सचिव
महानगरपालीका, अमरावती

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**